


नक्षत्रांचें देणें
आरती प्रभु
मौज प्रकाशन गृह

नक्षत्रांचें देणें

आरती प्रभु



नक्षत्रांचें देणें

आरती प्रभु

मौज प्रकाशन गृह

मौज प्रकाशन २३४

पहिली आवृत्ती
मार्च १९७५

दुसरी आवृत्ती
फेब्रुवारी १९७९

तिसरी आवृत्ती
ऑगस्ट १९९०

किंमत चाळीस रुपये

मुखपृष्ठ
पद्मा सहस्रबुद्धे

प्रकाशक
श्री० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

मुद्रक
प्र० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

१९७८ सालचे साहित्य अकादमीचे पारितोषिक

पु० ल० देशपांडे यांना

नक्षत्रांचें देणें

कविता

या माझ्या अजाण कवितेचा अपमान
कां करतां बाबांनो – कां?
प्रेम हवंय का या कवितेचं?
मग तें मागून मिळणार आहे का तुम्हांला?
खूप कांही द्यावं लागेल त्यासाठी.
काय काय द्याल?
आत्म्याची बाग फुलवतां येईल तुम्हांला?
पण त्यासाठी तुम्हांला तुमचा आत्मा
तुमच्याच तळहातावर
एखाद्या स्वातीच्या थेंबासारखा घ्यावा लागेल,
पण त्यासाठी तुमचे हात तुम्हांला
चांदण्याहून पारदर्शक करावे लागतील.
कराल?

माझ्या कवितेपासून मीही, तिच्याजवळ असून,
दूर असतों.
भीत भीत स्पर्श करतों तेव्हा तिचे डोळे
पाणावल्यासारखे चमकतात.
डहुळून जातात त्यांतले रानचिमणे विभ्रम.
ती एका पोक्त कलेने प्रौढ होते.
या कवितेच्या मुलायम केसांवरून
सरकून जातात श्यामघनांतले मंद संधिप्रकाश.
वाटतं की ती आताच उभीच्या उभी
निसटून जाणार आहे
दोन आर्त स्वरांच्या मधल्याच रिकाम्या स्वर्गात.

स्पर्श करतांना अजूनहि मी तेवढा शुद्ध नाही
एखाद्या बुद्धाच्या जिवणीवरील उदासीन हास्यासारखा.

या माझ्या अजाण कवितेच्या वाटेला जाऊं नका
कारण ती ज्या वाटा चालते आहे
त्या आहेत तिच्या स्वतःच्या नागमोडी स्वभावांतून स्फुरलेल्या.
मोडून पडाल!
तिच्या नावाचा जप करायचा असेल तर
त्यासाठी तुम्हांला तुमच्या कण्याच्या मणक्यांचे
रुद्राक्षमणी ओवून
जपमाळ करावी लागेल
आणि श्वासनिःश्वासांचा करावा लागेल कमंडलू;
पसरावें लागेल संज्ञेचें व्याघ्रचर्म.
आहे तयारी?
जा आपल्या वाटा हुडकीत आल्या वाटेने;
तिला पाहायचे डोळे प्रथम मिळवा,
मगच पाहा तिच्याकडे डोकें वर उचलून.
ती भोगतेय जें जें कांही त्यांतल्या तिळमात्रही वेदना
तुम्हांला सोसायच्या नाहीत.

मी स्वतः पाहातोंय स्वतःच्याच कवितेला
एखाद्या पेटलेल्या दिव्याप्रमाणे दूर ठेवून.

सरणार्थ

देवें दिलेल्या जमिनींत आम्ही
सरणार्थ आलों; शरिरेंहि त्याचीं.
दरसाल येतो मग पावसाळा :
चिंता कशाला मग लाकडांची ?

विसरूं पहातो एकेकट्याला :
रांगेतल्या या व्यंगार्थ काया;
पाळीत जातों सुतकें स्वतःचीं
हिजडा जसा की धरि ब्रह्मचर्या.

नसतेंच शब्दीं कधि कांहि द्व्यर्थी :
टिपकागदींचे असतात डाग;
दृष्टींत दाटूं घननीळ येतें :
तेंही तमाचा असतें तवंग.

अगदीच कोणी रस्त्याकडेला
स्वस्तांत मरतां, नयनांत दोन्ही
उस्फूर्त भीती . . . वेळीप्रसंगीं
उडवीत खांदे देतोंहि वन्ही.

उसनीं मिळालीं शरिरें अम्हांला
विक्रीस जोड्यांइतुकीं तयार;
चिंता न त्रागा . . . रांडेप्रमाणे
नियमीत घेतों सनदी पगार.

एकांतजागें मन फक्त मोनें:
खडकाळिचे की काळोखकोने;
सुखरूप आहों सुखरूप आम्ही
सर्वांत आम्ही सर्वांप्रमाणे.

जाग आली

एका सरळ रेषेला एकाएकी इजा झाली,
वक्र झाली...थांबली...भांबावली.
तो साज खरा होता देहाइतकाच. देहाशिवाय
आणखीही खूप खरें होतें.
वेळ लागत नाही माणूस मरायला हेंहि खरें:
परवा होता. काल होता. आज कातरवेळींसुद्धा.
पण तो साज गेला...घरावर पाऊस आला...
नंतरची पोपटपंची डोळ्यांच्या अश्रूंची:
संथपणे जिभेच्या चवीवरून उतरतें अन्न.
पोट आहे. भूक आहे. सुखासारखेंच दुःखही.
तसेंच घरदार: बंदपणाचें पिशाच्च.
मध्यरात्रीं जाग आली...पोलादाच्या रुळांवरून
धडाड धडाड एक आगगाडी निघून गेली.
काळोखांतल्या घड्याळाच्या वाटोळेपणांत
अधांतरींच्या क्षणाची ठिणगी पडली.

आधार

जोवर फुलांच्या बागा फुलताहेत,
पहाडामागे वारा अडत नाही,
शब्दांपोटीं सूर्योदयासारखा अर्थ आहे,
फळें नित्यनेमाने पिकत आहेत,
माणसाला उपकार आणि त्याची
निर्व्याज फेड करतां येत आहे,
एखाद्याची महायात्रा पाहून एखादा
सहजच नमस्कार करतो आहे
तोवर आम्हांला एकमेकांबरोबर
अबोला धरण्याचा अधिकार नाही.
आम्ही आमच्या पडजिभेइतकेच
सर्वार्थांनी एकमेकांचे आहोंत.
कालाचा प्रत्येक क्षण उष्टावतों
तरी काल ताजा टवटवीत आहे.

ईश्वराने दिलेलें हें अंग प्रत्येकजण
बारा दिवसांच्या अर्भकाइतक्याच
हळुवारपणे सर्व तऱ्हांनी धूत राहतो,
आपापल्या मापाचें पापपुण्य बेतून
सगळें आयुष्य कारणीं लावतो
म्हणून कधीतरीची प्रसन्नताहि
मनाचीं उन्हें करते आणि सारा ताप
उन्हांतला पाऊस होऊन टपटपतो.
धरेच्या पोटांत पाणी आहे,
घशाखाली त्याची तहान आहे,

माणसाच्या पोटांत आनंद आहे
म्हणूनच नेहमी भूक लागते,
इंद्रियाची वेल पसरत पसरत
झोपेचा गारेगार मोगरा फुलतो.

शेतकरी पिकाला जपत असतो
पहिलटकरणीसारखा, रात्रंदिवस
कायावाचामनाचा पावसाळा करून
मातीच्या कणाकणांतून झिरपतो,
अशा वेळीं आकाशाच्या कोनन् कोन्याचा
स्पर्श त्याला झुळकाझुळकांतून होतो,
हवेचेही कोनेकोपरे प्रत्यक्ष चाचपतो. . .
दाण्यादाण्यांतील धारोष्ण दुधाची जाग
पाखरांच्या पिसापिसांतून जाते,
थव्याथव्यांनी आनंद उतरतो,
शेतमळा डुलतो, वारा डुलतो,
शेताचा पिका पिका दरवळ
झुळझुळत्या झऱ्यासारखा
शेतकऱ्याच्या मनांतून वाहतो,
सुइणीच्या मुखावरील कष्टासारखी
रसरसून लखाखते कोयतीची धार.

जीवनावर प्रेम करणारे सगळेजण
एकमेकांना नमस्कार करीत करीत
सुखदुःख वाटतात जिवाभावाने,
सर्वांना पोटाशीं धरून सर्वांवर
स्वतःच्या आयुष्याची सावली धरतात,
एखादा अनवाणी चालणारा विरक्त पाहून

सांगतात : सर्वांच्या पायतळीं जमीन आहे,
एखाद्या मेलेल्या मित्राच्या स्मृतीवर
हलकेच कधीतरी अमोल क्षणांचा
एखादा ताटवा वाहून रात्रभर जागतात,
आणि मग कधीतरी झोपेतून उठून
स्वतःवरच आनंदाश्रू ढाळतात,
स्वतःलाच नमस्कार करतात.

सखीने सजणाला दिलेल्या गुलाबाच्या
गेंदाप्रमाणे, वचनाप्रमाणे प्रत्येकानेच
कधीतरी मन दिलें-घेतलेलें असतें;
सखी-सजणाच्या संकेतस्थलासारखेंच
हें आयुष्यहि एकमेकांचेंच आहे.
या जगण्यांत खोल बुडी मारून आलेला
एखादा कोणी सर्वांना पोटाशीं धरणारा
आणि ते पोटाशीं धरले गेलेले सगळे —
दोघांनाहि एकमेकांचाच आधार आहे.

मुंग्यांची रांग

मूलभूत तत्त्वांचीं पाळेंमुळें
खणून खणून तत्त्वज्ञ मेले;
त्यांच्या नावांचें इतिहासांत
सोनें झालें. . . भलें झालें.
मूलभूत तत्त्वें तरी कसलीं ?
त्यांच्यामुळें नक्षत्रें दिसली !
त्यांचीं नांवें आठवतात ?
छे, तीं तर कधीचींच पुसलीं.
ही ढगांची रांग, वरचे रंग,
रंगापल्याड क्षितिज, मग तवंग :
ती आपल्या डोळ्यांची मर्यादा.
पुढे देवाचें राज्य : 'श्रीरंग', 'श्रीरंग'
हसावें का थोडें ? मग थुंकावें !
खुशाल उंबरठ्यावरून भुंकावें !
दसऱ्याला सोनें लुटून द्यावें !
मग वर्षभर मरूनहि जावें.
ही मुंग्यांची रांग जातेय कुठे ?
तत्त्वज्ञांची पाऊलवाट ही इथे. . .
असेल असेल. . . इतिहासांत पाहूं
ही मुंग्यांची रांग संपली कुठे ?

हीं दोन बकरीचीं पोरें

हीं दोन बकरीचीं पोरें आहेत :
एक साधें, आपलें करडें आहे,
तर दुसरें करडें नाही, पांढरेंही नाही,
काळेंसुद्धा,
दोघें मिळून एक पोरपणाचा रंग.

ती समोर नेहमीचीच खिडकी आहे :
तींत कुणी उभें नाही,
तीतून कुणी पाहत नाही,
तीवर पडदाहि नाही,
घरांत कुणी खिडकींत उभें राहणारें वावरत असेल,
गंमतच आहे ही खिडकी म्हणजे.

हा आता डोंगर आला :
त्याच्या मागे-पुढे कोण असेल ? कसें असेल ?
कसे नसेल ? कुणी गवती असेल,
आणि वाराहि गवती आहे, झुळझुळणारा.

डोंगर उतरून जाऊं. गेलों.
तें खिडकीचें घर खूप खूप मागे गेलें,
पाठीमागे रस्ता आहे,
पुढेहि रस्ता आहे,
वळणावरहि रस्ता आहे,
वळणावर झाडहि आहे, वर पक्षीबिक्षी आहेत :
अनेक नाहीत, चारदोन चारदोन आहेत,

कांही थोडे ओले आहेत, कांही ओलेसुके आहेत,
कांही आंतून आंतून सुकेच आहेत.
झाडाने कुणाचें वळण गिरवलें आहे कोण जाणे!
ज्याने डोंगराची रेघ ओढली त्यानेच तर
झाडाला वळण दिलें नसेल ना गिरवायला?

हा पुन्हा एक म्हातारा:
हा तर म्हातारडाच आहे,
पिकूनबिकून गेलेला नाही,
अगदी सरळ सरळ म्हाताराच होत गेला आहे;
मी विचारलें, "कुठे निघालांत?"
तो म्हणाला, "मस्णांत." "जा बापडा," मी म्हणालों
पण मला वाटत नाही तो मस्णांत जाईल म्हणून;
तो वळणावर गेला आणि दिसेनासा झाला:
मरणारा वळणावरून जाणार नाही असें मला वाटतें.

हें शहर आलें:
हें फार मोठें शहर आहे,
इथे खूप खूप बाया झकासपैकी फिरताहेत:
आमच्या गावच्या नदींत
अशाच होड्या फिरतात;
जिथे खूप खूप बाया फिरतात तें शहर
आणि होड्या फिरतात तें गाव किंवा खेडें.
इथे बाया फिरल्या म्हणून काय झालें?
हें शहर असलें म्हणून काय झालें?
आपण दोन्ही पाहू – शहर आणि बाया.

हा कोण?
हा आकाशाकडे तोंड करून एकटाच काय पाहतोय?
आपणहि जावें. गेलों.
त्याच्या शेजारीं त्याला नकळत उभा राहिलों,
मग एक एक असे खूप आले,
आकाशाकडे तोंड करून उभे राहिले,
तो मग पहिला आकाशाकडे पाहणारा
ख्यॅक करून हसलां आणि निघून गेला,
सगळे मग निघून गेले, कुणी हसले मात्र नाहीत,
मी एकटा उभा राहिलों वर पाहत:
आपण च्यायला बावळट.

हे दोघे कोण?
आणि ते अशा वेळीं पुलाखाली कां गेले?
आपणहि जाऊं. गेलों. आम्ही आता चारजण:
ते दोघे, मी आणि काळोख.
पहिल्याने टमरेल पुढे केले,
दुसऱ्याने त्यात दारूची बाटली ओतली,
पहिल्याने टमरेल माझ्यासमोर धरले,
मग दुसऱ्याने सुरा बाहेर काढला,
मला दाखवला,
दुसऱ्याने टमरेलभर दारू पिऊन टाकली,
मी धूम पळत सुटलों. आम्ही पळपुटे.
ते तिघे: ते दोघे आणि काळोख.

आता कुठे जावे?
समुद्राकांठीं. गेलों. तिथे बाक होतें.
बाकाच्या पाठीवर लिहिलें होतें:

"श्रीयुत फणसेकरांनी हें बाक चि० स्वर्गवासी
इंदू हिच्या स्मृतिप्रीत्यर्थ बांधिलें. १६-१२-५९"
मी वाचलें. पुन्हा पुन्हा वाचलें.
दगडी बाकावर बसलों नाही, समुद्रकांठीं गेलों,
आणि भणभणत्या वाऱ्यावर
मी माझें अंग चिरगुटासारखें धरलें,
मग मी पुटपुटलों, "ही कुणा फणसेकरांची इंदू
ही पोरवयांत वारली, हिच्या स्मृतीस
मीही नमस्कार करतों." मी नमस्कार केला,
समुद्र गर्जना करीत होता,
वारा भणभणा वाहत होता,
मी उभा होतों.

दोन पोक्त पानं

दोन पोक्त पानं:
एक पिवळंगार, दुसरं हिरवंधम्मक,
बाजूबाजूला. दोघांचे देठ एकत्र थेट.
एकावरल्या रेघा
दुसरं वाचतंय; स्वतःच्या रेघांतून पसरतंय
पहिल्याच्या अंगांत.
दोनच तीं. इतरांतहि अशीं एकत्र दोन कित्येक.
वारा आला की एकत्र सळसळाट सर्वांचा.
पिवळ्या उन्हांत पोपटी पानं. . .पोक्त झाड उभंच्या उभं.

संध्याकाळ

संध्याकाळ :
निरर्थ वेळ,
माणसांनी गजबजलेलें घर
क्षणकाल थबकतें.
अटकलेली पीन झरझर झरझर
गरगरत राहते काळीशार बांगडी.
कबुतरांच्या डोळ्यांत सुकलेली ओसाडी
आणि तरीहि ओलसर,
तांबुस मंद, तरीहि घुमणें,
विचित्रपणें फडफडून ते जीव
घेतात जागच्या जागीं मांसल विसावा.
सर्स् ईल्ल् साऽऽ शहार शहार पंखांत
ओसाड ठणका. टाळूंतील तांबुस स्पंदन संध्याकाळ.
म्हाताऱ्या घोड्याच्या मनाचा एखादा
थकलेला कारकून
चव शोधीत जातो आपल्यांतलीच हलके;
पान चावून चावून चोथा कडूशार फेकतांहि येत नाही;
त्याच्याही पायांखाली असते संध्याकाळ.
तरुण वेश्येच्या
उद्ध्वस्त गर्भाशयाहून कमी नाहीत भडक
इथले हिचे रंग :
तावदानांत जाते स्वराहून जड बनून काच सुकत,
बंद करून घेतां येत नाही,
हातांवर येतें बधिर तिचें दूरचें अस्तित्व.

गवत असतें गार हिरवें

गवत असतें गार हिरवें,
मन असतें गवती;
अलगद अगदी
खाजगी त्याच्या वाटेला
जाणारीं पावलेंहि
चारदोन चारदोन असतील;
न असतील दिसतील :
न दिसतील वाजतील,
न वाजतील थबकतील;
गवती पक्षी, गंमत गवती,
गवती हेलकावे,
पुढे पुढे ऋतू गवताळी,
पाण्याला वास सुटतो उंच गवताचा;
गवतच
गवतांत गुंतून अवघड दाट;
हृदयच
हृदयाजवळचें वाजूं लागते सळसळ;
हलके हलके वर दाटींतून
वर वर चंद्र चढतो
की गवतांतून उमटून येतें
खाजगी प्रतिबिंब गवतलीन पिवळें;
चंद्र प्रीतीहून सायंकालीन.

मनमोर हिचा

येतील भराला **पाउसमहिने,**
ठरतील रुपाला हिच्या न ऐने.
वेल वाढली मंजूळपणे :
घनदाट हिचा घम्‌घमाट
पसरे पसरे
जशीं पाखरें
विहरती वसंतीं विपुळपणे,
अशींच अगदी मंजूळपणे.
अवयवच मुळी दागदागिने
दिल्‌दार हिचे दिल्‌दार,
सतेज चक्षू
जहागिरदार,
चाचपडावें जसें चांदणें
वनराईतुन तसें चालणें.
घन वळले घन घनघोरपणे :
मनमोर हिचा मनमोर
आनंद करी,
लखूलखाट
हिच्या अंगांगांच्या गर्दपणे :
घन वळले घन एकत्रपणे.

फिरो घाणा निरंतर

तम कोठे? कोठे पैल? जळो तेल,
जळो पाणी. . .फिरे घाणा फिरे बैल.

खंडप्राय आयु जाय तप्तरमीं
डांबरसें. . .थंडपणे कासाविशी.

सबंध सबंध काळ्या काळज्या या:
त्याच चिरगुटांपरी अंथराया.

घडे काय? नातें काय जीवनाशीं?
आत्मशक्ती कामीं येई अजीर्णाशीं.

अर्थ चिमणे चिमणे: शब्द मादी
बोले. . .मिनिटें मिनिटां विसंवादी.

मिळेल का कधी शक्ती आम्हां लोकां
(करुणा भाकाया त्याची) भव्य शोका?

फिरो पृथ्वी, फिरो घर, की नांगर
घरावर. . .मात्र फिरो घाणा निरंतर.

एक वळसा

एक इवलासा कुठलाही जीव,
त्याचें रडणेंकढणें,
उसासे : हें सगळें मिळून शेवटी काय?
एखाद्या रमणीय गोष्टींतल्या कारंजासारखें स्वप्न
त्या जीवाचें;
पण एका इवल्याशा जीवाला
हिशेबांत धरतोय का एक प्रचंड सागवानी राक्षस?
त्याने हिशेबासाठी मोडलेल्या बोटाच्या नखावरील
एक पांढरा शनी म्हणजेच तर नव्हे हा धाकला जीव?
तरीही पुन्हा,
पुनःपुन्हा,
पानें फुटणें, पानें पिकणें, तीं चक्रनेमिक्रमांत
गळून पडणें,
पुन्हा नवीन तवन्या फुटून हर्षखेदांची पुनरावृत्ति,
दवांतले ओले ताटवे,
शेजारून गेलेले हंगामी ओले पक्षी,
रमणीचे ओले डोळे,
हेंसुद्धा एखाद्या नुक्त्याच भरायला आलेल्या
कोवळ्या कोवळ्या आरशासारखेंच
प्रसन्न पण कष्टी, मावळत्या ताऱ्यांचा संधिप्रकाश
शोधणारे काचेच्या करवतीसारखे उंच निमुळते सूर,
राक्षसच सर्व मिळून
एक प्रचंड समुदाय;
त्यांतील एक इवला जीव : इवल्या वेलीचा पुरातन वळसा,
त्याचें रडणेंकढणें, त्याचे उसासे.

त्याचे लासलेले चंद्रकिरण,
त्याच्या घराचें स्वतंत्र छप्पर,
सर्व मिळूनसुद्धा तो पुन्हा इवलासाच त्याच्यासह,
त्याच्यासह तो चालतोय वेलीच्या पुरातन वळशाच्या
वळणावळणांनी नकळतच स्वतःच्या.

पात वाकली भारानं

थोर जोंधळ्याची पात
पात वाकली भारानं,
कणसाकणसामध्ये
दाणे तुडुंब जारानं.

जार वाळला उन्हानं :
जाली उन्हाची साखर;
गेली वाऱ्यावर वार्ता :
आलीं दूरचीं पाखरं.

चित्त थाऱ्यावर नाही
रावबाजीच्या लेकीचं,
तोंडी बांधून घुंगरू
फेकी पाखरू नेकीचं.

गुच्छ फुलांचे निरिच्छ

हजार मोरांचेच पिसारे : अंधारच की सगळा :
अंधारच सहवास तिचा तो एकदाच जो घडला.
नुक्तिच उठली नक्षत्रांतुन आळसलेली दृष्टी,
अवघड झाला हृदयाइतुका पदर तिचा जो ढळला :

पोक्त पिकेसे विसावलेले वारे पदरावरती
चाळवले अन् पुन्हा थबकले, झाले कोमट गवती;
दिसूं लागले संगमर्मरी पाषाणांतिल स्पंद,
मिनिटामिनिटांमधले लोलक हळूच अन् किणकिणती.

क्षितिजीं उतरे गारगारसा मेघखंड जडशीळ :
आयुष्यांतुन पसरे कडवट चव त्याची घननीळ;
नव्या जन्मल्या मातीसम अन् जड नेत्रांचीं पातीं,
काचेवर अन् उठे त्वचेच्या हंसांचा स्वरमेळ.

काळ्या पोशाखांतिल उल्का झिणझिण तुटली गात्रीं,
त्या मद्याच्या क्षणार्ध आला निरभ्र आशय पात्रीं;
गुच्छ फुलांचे निरिच्छ घळले वसनावरुनी काळ्या,
पाठमोरिं मग कितीक झालीं नक्षत्रें त्या रात्रीं. . .

हजार मोरांचेच पिसारे अंधारावर आले,
वेढुन आले तिच्याच देहा तिच्याच देहीं मिटले.

भ्रमिष्ट

भ्रमिष्ट कोणी भरमाध्यान्हीं
भररस्त्यावर आला,
सर्व भराभर उतरून वस्त्रें
पूर्ण नागवा झाला.

पेटवुनी मग वसनें मारी
दील फाडुनी बोंब,
उन्हांत उठला क्षणांत भडकुन
थोर आगिचा डोंब.

उभा राहिला निमुट निमिषभर,
वळला हलके दूर,
दूर जसा की स्मशानवासी
वळतो भंगुर धूर.

दिली कशाला आग लावुनी
नव्हतें त्याला भान;
मन ज्वालामय जाळित होतें
आर्द्र जिवाचें रान.

लुटारू

लुटारू डोळे,
सुखासीन अंगें
पण उदासीन रंगछटा;
तिचेच ओठ,
तिचेच दात
गरम-थंडे,
पण त्यांतील गाणें
ऐकतांना सर्वस्व जातें ओसंडून कारंजें
आयुष्याचें :
त्यावर एक ताटवा घुसमळून जातो फुलोरपणे
संध्याकाळच्या किरमिजी कवडशांसारखा.
लुटारू ती मात्र संथ उदास
दूरस्थ विचित्र मेघाचा आकार देत
स्वतःच्या गाण्याला
येते, जाते, उभी राहते
ताठरपणे,
वृक्षासारखी पोक्त
अन् पानांसारखी रानवाऱ्यांतल्या मंजूळ,
खोडकर रानकोवळी निर्झरी,
अडाणी नागमोडी, वळणावळणावर लुटून घेते
आपली रात्र.

टप्पोर गजरा

तूं किती लांबचं पाहशील ?
ही तार कुठं गेलीय सरळ रेघेंत ?
जाईना कुठंहि.
सरळ रेघ संपली जिथं तिथं एकच मेघ भरतोय.
भरेना बापडा.
तुझ्या या इवल्याशा मनगटांत नेहमीसारखा
बांध तूं आपला टप्पोर गजरा.
उगाच का बसवलीय घरं बांधणाऱ्यांनी ही ठाकठीक खिडकी ?
तूं आपली उभी रहा अंतर्बाह्य आरसा होऊन.
खिडकीसमोर गिरक्या घेईल पिवळीशी पाकोळी.
हात मात्र चुकूनसुद्धा बाहेर काढायचा नाही हं !
इवलं मनगट टप्पोर गजरा.

डहाळी

डहाळी ती डहाळीच थोड्या अवघड तऱ्हेची,
तिच्यामागं चंद्रकोर,
तिच्यामागं निळंभोर आभाळ खिडकीतनं पाहावं,
चंद्रकोरीचं वारं गजागजांत फिरावं,
डहाळीचं पाखरू मात्र चूपचाप बसलंय.

पेरलेल्या दाण्यादाण्यांत

आकाश कोसळेल असें वाटत नाही :
तसें म्हणणारे आहेत फक्त अहंमन्य.
पुढे न घडणाऱ्याचे नगण्य घण
शब्दांत पाडून पदरीं घेतात अर्थ शून्य.
पुढच्याला लागलेल्या मोजून ठेचा
ज्यांनी रचलेत शाळकरी बाळबोध वेचे
त्यांनी कधीतरी वेचले आहेत काय
स्वतःचे तुकडे स्वतः कालपरवाचे
अर्थविषण्ण सायंकालीन गाण्यांत ?
आणि भरून येतांना मेघासारखीं हृदयें
आणि विरून जातांना अखेरचीं किरणें
कधी प्रत्यंचेसारखी ताणलींत वलयें ?

विसरूं नका ! तुमच्याहि डोळ्यांतील
बोबड्या चंद्राआड येईल लिंबाची फांदी,
तेव्हा तरी विसरा तुमची ती नेहमीची
शिळ्या भाकरीसारखी कडक ज्वलंत नांदी !
थोडे सावध असा ! हे मुखवटे आहेत !
ते कधीतरी फुटलेच तर क्षमा करा
सर्वप्रथम तुम्ही तुमच्याच चेहऱ्याला :
त्यालाहि येते वयपरत्वें एक स्वतःची जरा.
नाहीतर आरशांत पाहाल, उदास व्हाल,
धार चढवाल मस्तवाल तुमच्या वस्तऱ्याला.
असें कांही करूं नका आणि उगी मरूं नका.
स्मरा काष्ठवत् ओठांवरच्या वाळलेल्या जाराला.

उभे राहा, हाका मारा, येतील सखेसोबती,
एकमेकांना देतील घेतील कांहीबाही.
पेरलेल्या दाण्यादाण्यांत असते प्रसन्न
(थोडी आंच द्या) एकेक शुभ्र सजीव लाही.

अर्पण करतां येतंय तुला

अर्पण करतां येतंय तुला, मीही घेऊं धजेन :
एवढ्यांत संपेल तुझा हट्ट, तुझा पाठलाग ?
कां नुस्तेच ओठ मिटले ? सांगायचं नसेल का ?
फुटणाऱ्याच लाटांना हात देऊं जाशील तर
देहावरचा साज — त्याची विल्हेवाट होऊं देशील का ?

देणाऱ्याला भान नसतें, घेणाऱ्याला नसतें मन,
हिशेब नसतो किती पडतील काचेवरती घण.
कां ? आतां कां नुस्तीच ? देऊन झालें असेलच.
पिसासारखी झालीय हवा, निळ्याभोर दाही दिशा;
"ज्योतीचाच पतंग झाला" उत्तर सज्ज असेलच.
हे बघ आता रंग आलेत, घंटाध्वनी येताहेत,
पाणी शेंदरी झालंय, फिटून गेलंय अभ्र,
गळ्यामधले बाहू काढ ! रात्र मोकळी झालीय. . .
अजूनही आहे म्हणतेस चित्रफलक पांढराशुभ्र ?

गाडा

कुणासाठी, कुणासाठी, कशासाठी, कुठवर
रेटायचा ऐसा गाडा इमानाने जन्मभर?
गाणें सुरू झालें तेव्हा चंद्र होता डोईवर,
गाणें मध्यावर आलें – चंद्र झाला रानभर,
गाणें संपलें आणिक पक्षी फडाडला तमीं
आणि तसाच मिटला घरट्यांत. . . अंतर्यामीं.
वाट रानांतली किर्र, हुरहूर सर्वदूर,
चक्रें फिरती फिरती, करकरे चराचर,
कळ्या फुलतात येथे, पानें गर्द वाजतात,
फुलें घळतात येथे तरी पानें वाजतात,
पानें झडतात येथे तरी वारे वाजतात,
वारा पडला तरीही दूर घंटा वाजतात.
कुणासाठी भरूं पाहे डोळां ऐसें उष्ण पाणी?
कुणासाठी झरताहे झरा गप्प ऐशा रानीं?
कुणासाठी झरताहे आयुष्य हें क्षणोक्षणीं?
कुणासाठी रस भरे सालोसाल फळांतुनी?
प्रश्न नव्हे पतंग अन् खेचूं नये त्याची दोरी
आणि खेचली तरीही मिटेल का चिंता सारी?
कुणासाठी, कशासाठी, कुठे आणि कुठवर
ऐसें घोकीत घोकीत व्हावयाचें दिगंबर.

अर्थ

अर्थ कशाचा पाहसी ?
कोरी पाटीच हाताशीं
आणि हताश उराशीं
        फक्त धापा;
        कुठे खोपा ?
आल्या चिमण्या दाराशीं
(फारा दिसांच्या उपाशी
तुला) कांही सांगण्यासी;
        श्रीगणेशा-
        आधी भाषा,
अर्थ, नंतर – ?

कसा ?

पाण्या रे पाण्या,
तूं कुठे धावतोस ? कसा ? कुणासाठी ?
पाना रे पाना,
तूं कसें शोधतोस तुझें नेमकें झाड ?
काय रे पक्ष्या,
तूं कसा येतोस पुन्हा घरट्यापाशीं ?

खार

तो मेला तेव्हा अगदी एकटा होता,
तो जगला तेंहि पुन्हा एकट्यानेच.
तो जन्माला आला तेव्हा सकाळ होती,
तो मेला तेव्हाहि सकाळच होती.
तो अखेरपर्यंत फिरला आपल्याच घरीं,
तो अखेरीला गेला आपल्याच घरीं.
कुणी म्हणाले, मेला; कुणी म्हणाले, गेला;
कुणी म्हणाले, आम्हीं त्याला अग्नि दिला.
तो होताच कुठे तेव्हासुद्धा? जगतांना
तो होता असेल कदाचित् रामायणांतील
सेतुबंधाच्या उद्योगांतील एक आत्मा
एका खारीचा, रेतीचा कण कण आणणारा.
पण ती खारहि मेली असेल एखाद्या
खडकाखाली रामाचा हात पाठीवर असूनसुद्धा.
त्या खारीचें शेपूट राहावें
एखाद्या बाळबोध पुस्तकांत: एखाद्या
मस्तकांत त्याची आठवण जागी असावी.
तो जगला आणि मेला या वाक्यांत
फार तर शब्दांचा पेंढा भरतां येईल; पण
त्यापुढे पूर्णविराम देण्याचा अधिकार
त्या सेतुबंधाभोवतीच्या सागरालाच आहे.

गाणें

सबंध घरांत गाणें सुरू आहे,
दिवे लागायला अजून थोडा वेळ आहे,
खिडक्यांच्या गजांतून आलेलीं उन्हें
सरकताहेत गाण्यापाशीं मंद मंद फिकीं,
एक स्कर्टवाली मुलगी गिरकी घेत गेली
कुठल्यातरी खोलींत :
गाण्यानेच फेकली फुलांची ओंजळ.
नागमोडी जिन्यांचीं बुडताहेत वळणें भरगच्च
मंद्रांत, दिवे लागण्याची सम येतेय जवळ,
जिन्यावरून जातोय कुणी वर वर धीरवान पुरुष,
टक् टक् टक् टक् संपत गेली बुटांची टपटप,
माडीवरच्या एका खिडकींत उजळला मंद दिवा,
त्याने धिमी शीळ घुमवली, पोशाख उतरला,
सिग्रेट शिलगवली.
सबंध घरांत गाणें सुरू आहे :
एकेका खोलीचें भान हरपतेंय,
एकेका दाराचा अडसर गळतोय,
भिंती सगळ्याच होताहेत पारदर्शक,
तो उभा आहे थोड्या उंचीवर,
ती उभी आहे जागच्या जागीं लपल्यासारखी,
त्याला ती दिसली भिंतींतून,
तिला तो दिसला नाही,
तिला फक्त जाणवला माडीवरचा दिव्याचा
पायांवर सांडलेला गिटारीच्या स्वरासारखा
थरारता कवडसा,

आणि त्याचा रुंद खांदा तिच्यासमोर आला,
तिने डोकी टेकली त्याच्या नग्न छातीवर :
ती गाणें ऐकतेय,
तो गाणें ऐकतोय :
एक सबंध गाणेंच गाणें म्हणतेंय
आणि एक सबंध गाणेंच गाणें ऐकतेंय.

वाफ

शेजारींचा नाला येतां पावसाळा
थोर बळावला घरींदारीं.
संसार जाहला एक भातुकली,
जळीं तरंगली मांडावळ.
खाटेवर आम्ही बैसलों बापुडीं,
पोर होड्या सोडी खिदळत.
माय म्हणे मला, "बरें झालें झिला,
आळशाला झाला गंगालाभ."
बाईल हासून "मरतील" म्हणे,
"पाण्यांत ढेंकुणें आयतींच."
मी मला म्हणालों, "नाल्यांतलें घर
नक्की मिळणार समुद्राला."
पोर पाठ करी : "समुद्राची जेव्हा
वाफ होते तेव्हा ढग बने."

निःस्तब्ध

एक पक्षी
नेहमीच सायंकालीन;
एक गाणें नेहमीचेंच उदासीन.
शय्येभोवती खिडकींतून वारा येतो,
नंतर गंध. . .नंतर सूर. . .नंतर कंप. . .मंद प्रकाश. . .
एक पक्षी
नेहमीच सायंकालीन उजाडतांनासुद्धा
हवेवरून भरारतांना बागेतील कळ्यांना कळतो,
पानावरून शहारा येतो,
सगळीं झाडेंच स्तब्ध होतात सायंकालीन,
जसा काय निळासावळा झराच होतो वनस्पतीमय,
वास येतो थोडा ऊन, थोडा पावसाळी धुकाळ.
एक पक्षी
उदासीन काळ्याकरड्या रंगाचा:
त्याला जें म्हणायचें असेल त्याचा सूर
त्याला दिसतोय त्याच्या समोर
एखाद्या लालबुंद सूर्याच्या सायंकालीन किरणाप्रमाणे.
एक गाणें
असें असें सायंकालीन मेघाप्रमाणे निःस्तब्ध:
एका पक्ष्याचें गाणें, एका मेघाचें गाणें,
एका खिडकीचें
अन् या शय्येचेंहि,
सर्वांचेंच पण सर्वांआधीचें,
सायंकालीन रंगाचें अन् तसल्याच एका अर्थाचें,
कधीकधी गवतावरच्या पक्षी उडून गेल्यानंतरच्या

हेलकाव्यांचे.
सायंकालीन पक्षी अन् त्याला भेटणारें गाणेंहि
सायंकालीन कुणाच्या डोळ्यांतहि किरमिजी निःस्तब्ध.

अर्थ

मांजरीच्या पिलांचे डोळे नुकतेच उघडलेले,
कुठूनतरी आलेलें पत्र नातलगांच्या खुशालीचें,
मुलें म्हणताहेत, "ओटीवर झोपाळा बांधायचा का?"
नुक्तीच एक केळ पसवून पोक्त झालेली...
अर्थहीन पण सूत्रबद्ध असे अनेकजण
अनेकदा खाजवतात उघड्यावर मांड्या,
तरी मांजर कशी स्पर्शाळूपणे पाहूं शकते?
केळसुद्धा पसवते? खुशालीचें पत्र कसें येतें?
उजाडणारा प्रत्येक दिवस आकाशाचा गर्भपात,
जीवनें असतात अनेकदा आत्महत्यांच्या अफवा,
तरी पाहा ना कशी फूल फुलण्याच्या प्रक्रियेसारखी
हळुवारपणे जिरवतेय ही माझ्या तान्ह्याच्या टाळूवर तेल!
या सगळ्याचा अर्थ गजकर्णाच्या मांडीइतका:
कदाचित् तो अर्थ म्हणजेहि खाज असेल, नसेलहि,
पण या चामडीच्या गाभ्यांत आज अनंत वर्षें
नांगरून पडलेंय गाणें...तरी सुरू कसें पैपैसा देणेंघेणें?

उदासी

ती येते आणिक जाते,
येतांना कधि कळ्या आणिते,
जातांना पण फुलें मागते.
येणें-जाणें,
देणें-घेणें
असतें गाणें जें न कधी ती म्हणते.
ती येते आणिक जाते . . .

येतांना कधि अशी लाजते
तर जातांना ती लाजविते :
कळते कांही उगीच तेंही,
नकळत पाही कांहीबाही,
अर्थावाचुन असतें 'नाही', 'हो'ही म्हणते.
ती येते आणिक जाते . . .

येतानांची कसली रीत :
गुणगुणते ती संध्यागीत,
जातांना कधि फिरून येत,
जाण्यासाठिच दुरून येत,
विचित्र येते, विरून जाते जी सलते
ती येते आणिक जाते . . .

कळ्याफुलांच्या मागे येते,
कोमट सायंचेहरा घेते,
उदी उदासी पानीं भरते,

"मी येऊं रे?" ऐकूं येतें:
मध्यरात्रभर तेच तेच ते प्रतिध्वनी ते.
ती येते आणिक जाते...

चाहूल

संधिप्रकाशांतुनि जाणारा संधिप्रकाशापरी:
संदिग्धाच्या सन्निध लागे चाहुल ही शेंदरी;
पक्षि परतल्यानंतर आलें वळण हवेस हिवाळी,
दिवे गारव्यापरी जाहले शोकगितांच्या ओळी;
कुणी अवलिया ओढित गांजा: तत्त्वच आयुष्याचें,
पीळ घालितो सूत्र ताणुनी सखोल अदृश्याचें;
विसावलेल्या शहरावरती थव्याथव्यांनी उतरे:
पोलादाच्या थरकापापरि तम चहुबाजू पसरे;
पुसावयाचें अंतर कोणी दृश्यादृश्यामधलें?
कळ्या सकाळीं फुलावयाच्या हें तर कधिचें ठरलें;
दृश्यादृश्यामधून जातो सूर्य फाकुनी कितिदा,
सूर्यास्तापरि मंद्र हळुहळू ये डोळ्यांवर पडदा:

संधिप्रकाशांतुनि जाणारा संधिप्रकाशापरी:
या पडद्याची आग शेंदरी गारच डोळां तरी.

विळखे

काल तूं नव्हतीस,
आज तूं आहेस,
उद्या तूं
असणार असशील होत्या-नव्हत्याच्या लाटांवरील संधिप्रकाश.
नैवेद्य मागणारा काळ
अक्राळविक्राळ,
उपाशी
तरीसुद्धा कळ्या गिळणारी एक पाशवी समर्थ असोशी :
तिची सोनेरी छटा मुक्त कचपाशावरील.
सनईच्या सुरावटीतील स्वरांचे सुरवंट प्रभातकालीन
तसेच तुझ्या पाहण्याचे प्रहर, त्यांतील धुक्याचे कुसुंबी क्षण
विषमय नव्हेत तरीसुद्धा
बेहद्द उद्दाम :
त्या डोळ्यांनी तूं केलेली बदनामीही बदामी असते;
अद्दल घडलेले घडे फुटूनसुद्धा भरलेले असतात;
चक्कर देणारे भोंगळ बहाणेही ससाणे होतात;
वाटायला लागतें की आम्ही कोण तुझ्यापुढे?
दुःखाचा डोंगर रचणाऱ्या पापण्या उचलून पाहतेस
तेव्हा सूर्योदयावरील मेघखंडालाही स्तनाकार मिळतात,
सापडतात विचित्र आकार लहरी हवेला
आणि निर्झरांच्या सोनसाखळ्या उस्कटून पडतात रानोमाळ,
भासमान होतात मंद्रसप्तकाचे जन्म-आदिकाल,
झाडांचे बुंधे समंधांसारखे रात्री खातात ओरबाडून
आणि मातीच्या कणाकणांतून कळे धरतात गेलेले पावसाळे.
हें छप्पर खरेंच आहे

पण त्याखालचे आधार अंधारस्तंभांसारखे विळखे देतात.
काल तूं नव्हतीस ?
खरें नव्हे. आज तूं आहेस ? खरें नव्हे.
उद्या असणार ? खरें नव्हे.
फक्त तो एक शिल्पकार खरा ज्याने वाऱ्याला दिले
झाडाझुडपांचे स्पर्श, विळखे.

गाण्यांच्या वेळा

फुलें स्पर्शापरी वाऱ्याच्या वाऱ्याच्या;
स्पर्श कोन्याकोन्यांत घरादाराच्या;
वारा कसलाही : भरधाव रेलगाडीचा;
स्पर्श कसलाही : स्वतःच्याही हातापायांचा;
सूर : कल्लोळच की रंगाचे रंगाचे;
रंग पावसाआधीचे, नंतर-नंतरचे,
कसलेही : शवावरील भरगच्च हारागुलालाचे;
कल्लोळ गर्दीमधल्या अंगचोर पदरांचे;
आनंद : शुभ्र पिकला चेहराच वृद्धाचा :
जगणें-मरणें आनंद आनंद त्याचा;
संपूर्णता कसलीही : गर्भारणीच्या जीवाची,
प्रसूतीनंतरच्या ताज्या श्वासनिःश्वासांची;
श्वासनिःश्वासांच्या लयी या गाण्याच्या :
अनेक गाण्यांच्या वेळा अशा अशाच असायच्या.

क्षमा केली म्हण नऽऽ

सोइस्कर : मग तो एखादा ढग असेल,
काचेचं तावदान, किंवा तिचा स्वतःचाच शेला,
आवडीची मिठाई किंवा गवती हवेची मिटकी,
वाजवील चुटकी देऊन कशाचाही हवाला.

मग म्हणेल मला, "तें नऽऽ ? ऊंहूं नाहीच्च."
ओठ मिटील गच्च. काय 'तें' विचारावं
तर सांगेल, "पिवळी साडी, पंखा, तीन खुर्च्या,"
जें जें दिसेल तें. . . कशालाही ठेवील नाव.

या नाव ठेवणाऱ्या दृष्टीचं छटेल पातं
केव्हा तरी ओलावतं, खुणेनंच बोलावतं,
जवळ गेल्यावर म्हणतं, "हृदय आपलं
जसं काय रानचं वारंच अनिवार हेलावतं."

सांगते, "याद राख, पळूनसुद्धा जाईन बरं.
आपण आहों मोठ्ठी मुलखाची बनेल."
विचारील, "हें हें काय तुला वाटलं खरं ?
मिठींतलं माणूस याहून काय म्हणेल ?"

चुकचुकेल गंमत म्हणून, टाळ्या पिटील,
खिडकीतून डोकावून पडेल पांढरीफटक,
विचारील, "त्या त्या रस्त्यावरील प्रेतयात्रेला
आम्ही असूं जबाबदार ? करा आम्हांला अटक."

तीच विचारते प्रश्न, देते स्वतःच उत्तर,
स्वतःच होते घुम्म. स्वतःच तिनं घुमावं,
आपण आपलं गप्पगार दूर उभं राहावं,
गालावरचं मीठपाणी तिच्या टिपून घ्यावं.

"टिपून काय घेतलंस ते कशासाठी सांग नऽऽ?
पापण्या खूप खूप हलक्या झाल्या बघ नऽऽ!
तुला काय पर्वा माझी, राक्षस आहेस राक्षस."
मग म्हणेल, "चुकलें रे, क्षमा केली म्हण नऽऽ!"

असो आच इंद्रियांत

संसारांत राहून काय झालों?
पोराबाळांचा फक्त बाप झालों.
समाजांत राहून काय झालों?
वृत्तपत्रांचा एक वाचक झालों.
प्रवासांतून घेऊन काय आलों?
डायरी: तारखा फाडून तृप्त झालों.
शिकणार काय? शिकवणार काय?
नाकीं शिंक, तोंडीं जांभई, वहाणेंत पाय.
देवपूजा करणं आहे — वय होतंय,
पांढरीं फुलं घेऊन एक भूत येतंय.
दिवा मालव अंधारांत, उजेडांत
डोळे झाक, असो आच इंद्रियांत.

कहाणी

वारा असा वाहतोय हा कुठल्यातरी बागेवरून :
कुठं असेल? कधी फुलेल? तुला आहे का माहीत?
कां? नुस्ती हसतेस कां? सांगायचं नसेल का?
बागेसमोर कोण उभा? आहे का माहीत?
टप्पोर कळ्या फुलल्यावर हसण्यावारी नेशील का?

हलतायत कां पानं अशी, ताजी ताजी राजीखुशी?
खार तेवढी मला दिसली : तूं तिचं चित्र काढ.
कां? नुस्ती पाहातेस कां? सांगायचं नसेल का?
खार हलली हळुचूकन : काय झालं नजरेआड?
पापण्या अशा मिटल्या तरी डोळ्यांतलं लपेल का?

दार वाजतंय कां असं? कोण कधी आलंय बाहेर?
किणकिण नुस्ती ऐकली मी; तूं तरी कुठं आहेस?
कां? अशी उदास कां? सांगायचं नसणारच.
सज्ज अशी माझ्यासमोर : यांत तरी कुठं आहेस?
राणी अशी होतांना तुला तूं छपवलं असणारच.

मळ्यांत मळा साळीचा, गळ्यांत गळा दोघांचा;
आभार तरी मानूं दे हुन्नरी त्या माळ्याचा.
कां? अशी घुम्म कां? सांगायचंच नाही का?
पावरी तरी वाजणारच ओठ गरम झाल्यावर;
सूर एकदा सुटल्यावर नकार नुस्ता पुरेल का?

कुठली कहाणी सांगूं म्हणजे नको नको म्हणशील?
गाणाऱ्या पाखरांची? मावळत्या गावांची?
कां? आधीच नको कां? ऐकायचंच नसेल का?
हुरहुरत्या त्या डोळ्यांत कसे बुडून गेलेत गाव:
एखादा तरी मावळता चुकून तरी दिसेल का?

सर

भुईवर आली सर
      सर श्रावणाची,
भुईतून आली वर
      रुजव वाळ्याची

भुईवर आली खार
      खार धिटाईची,
भुईतून कणसांत
      चव मिठाईची.

भुईवर आलीं उन्हें
      उन्हें पावसाचीं,
पायीं तुझ्यामाझ्या भुई
      चिक्कणमातीची.

गर्व

घरादारा गर्व
गर्व तुळशीचा,
तुळशीला गर्व
वाती-रांगोळीचा.
रांगोळीला गर्व
सवाष्ण हातांचा,
हातांना अन् गर्व
मंजूळ चुड्यांचा.
घरादारा गर्व
केळीच्या बनाचा,
संसाराला गर्व
शीतळपणाचा.
गर्व ऐसा थोर
दिवेलागणीचा,
ओटीवर हले
झोपाळा कड्यांचा
ओशाळला राजा
चौदा चौकड्यांचा.

असा एक . . . अशी एक

हा गुच्छ कां
कां म्हणून उस्कटलास ?
– येत होता यालाही वास –
मी किंचित दुर्लक्ष केलं म्हणून ?
गवताच्या पाती
पाती हलल्या की हलणारच
वरचीं उन्हं, वरचं चांदणं
म्हणून काय वाऱ्याला बांधशील ?

एखाद दिवशी
न विचारतांच सांगतेस :
"काल नाही रे यायला जमलं,
नुसते नुसते पोशाखच बदलीत होतें,
आरशाला तर तडा गेलेला नव्हता ना ?"

एखाद दिवशींच
सांगतेस : "काल लवकर आलें रे.
काय आणलंय पाहा ना, पाहा ना."
डोळे मिटून म्हणतेस :
"या डोळ्यांतील वाहणाऱ्या पाण्याला कशानं बांधशील ?
हा गुच्छ उस्कटलाय,
संध्याछाया लांबल्यात आता,
निघायचंय ना ?" – हें तुझं नेहमीचंच.
मग दुसऱ्या दिवशीं दुसरंच वेडसर बोलणं :
"सावल्यांच्या पल्याड असा एक देश

जिथला वेष नको उतरायला, चढवायला."
असा एक देश. . .असा एक. . .अशी एक.

दूर दिवा

सायंकालिन घन एखादा मंद किरमिजी :
असेलसुद्धा गतजन्मींचा पोशाखहि तो
तुझ्या तनूवर झुळझुळणारा; आज उदासी
अशी सांज ही दुरून पाहतां विरून जातो.
काजळभरले अशांत डोळे कुठे लागले ?
आणि कपोलांवरी असे कां अश्रु उतरले ?
"टिपूं नका ते." हळुच म्हणालिस, "कारण – कारण
तृणपात्यावर पडतें दव हो काय सकारण ?"
उत्तर कळलें; पहा उडाला थवा पारवा :
एकच मागे रेंगाळत हा घुमतो कां पण ?
"उत्तर कळलें त्यालाही," तूं पुढे म्हणालिस,
"गतजन्मींचा तो घुमणारा एखादा क्षण."
सायंकालीन वेळ अशी ही – कुण्या कवीची
गर्द निनावी बागेमधल्या ओळ असे की;
असेलसुद्धा गतजन्मींच्या मृत्यूच्याही
गीतांमधली. दूर दिवा बघ, तो एकाकी.

सर्व ठिकाणीं

हसताना जीव घेतेस :
मग तुझं सांत्वन,
मग निघायची तयारी,
मग म्हणतेस, "आज तूं हास,
माझाही जीव जाऊं दे."
हसतों.
तूं शांतपणे गप्प.
अखेर यांतही मीच मरतों.
मग तुझं लाजणं,
मग वाऱ्यावर केस सोडणं,
उग्गीच मानेला झटका देणं,
हज्जार हरकती, हिकमती, हुकमती,
मधूनच तुझी अस्पष्ट किंकाळी :
"अरेरे! अयाऽऽई गऽऽ! कसा रे तो,
असा कसा तो? मरणार होता.
मरून चाललं नसतं त्याला :
घरीं असतील ना त्याचीं कुणीतरी!
त्यानं जपलं पाहिजे स्वतःला.
त्यानंच कां? सगळ्यांनीच
जपलं पाहिजे स्वतःला. . . होऽऽ
प्रत्येकाचंच घरीं असतं रे.
असेलच ना कुणीतरी?"
मग तुझं भान हरपणं,
डोळ्यांतल्या डोळ्यांत रडणं,
जवळ येणं, मला स्वतःला जपणं

हें हें सगळंच जीवघेणं.
तुला भेटणं :
पुन्हा पुन्हा मरणं
घरीं, दारीं, बाहेर . . . शयनीं,
सर्व ठिकाणीं.

निसर्गचित्र

नक्षत्रांनी गोंधळलेल्या
काळोखाहून सौम्य आभाळी
तिचे डोळे.
ती स्वतःच त्या डोळ्यांतील
किंचित् ओलें निसर्गचित्र.

स्वराघातांनी
ठसवलेली मध्यरात्र.
क्षणाक्षणांनी साठवलेली,
फळभाराने वाकलेल्या
फांदीसारखी, स्तब्धता.
देह झालाय मूक, अभिनय ऐकण्याचा;
प्रत्येक पेशीवर एकेक तीक्ष्ण पीन
सर्वस्व ऐकतेय.

भविष्य

शब्दाआधीची शांतता : त्यांत तूं,
शब्दानंतरची शांतता : त्यांतही तूं.
पाखरं आलीं होतीं, उडालींसुद्धा,
पाखरं उडालेलीं पुन्हा आलींसुद्धा.
एकेक मंत्र तुझा, मुग्धही पुन्हा तूं;
एकेका पाशांत प्रशान्त मी अन् तूं.
हें पात्रसुद्धा प्रतिबिंब लिंबकान्त
नाही दाखवीत, नुस्तेंच प्रवाहित.
काय कुठे चाललोंत, कुणाची कुणाला
लाभलीय संगत? जरूर कुणाची कुणाला?
अशान्त कोण? झालोंत कां अनिकेत?
जीवनसूत्राची खेच : पाय कुठे पडावेत?
भेटलीच आहेस नको त्या वळणावर;
भूतसुद्धा होईन म्हणतेस मरणानंतर सरणावर.
सुंदर नसतो — असला तरी नको मृत्यू तुला;
शब्दानंतरच्या शांततेत हवीस तूं मला.
गाणाऱ्याने नुस्तें नये जाऊ गाऊन,
जातांना गाणेंच सबंध जावें घेऊन.
याहून काय सांगूं? हवा तर हात पुढे कर :
वाचीन शब्दहीन रेषा, डोळे मात्र बंद कर.

तुटलेला कडा

अनाम पाखरांचा एक थवा
जातोय तरंगत मंजूळपणे;
हवा : तंतुवाद्यच : छेडतोय
मेघयक्ष किरमिजी उदासपणे.
हा काय आहे संध्याराग?
छे. ही तिच्या येण्याची वेळ.
येईल. हनुवटीवर घेऊन ओंजळ
बसेल हवी तशी स्वस्थ सुरेल.
हिला कुणीं शिकवल्या या
कलंदर कळा? कुणीं दिलेत
पराभवाचें पोलाद पचवणारे
हट्ट? जे वाटताहेत मागावेत.
पोशाखसुद्धा नामोहरम
करताहेत उद्दामपणे डोळे.
कळत नाहीत तिचे बहर
आलेले अन् मावळलेले.
हिच्या एकेका पवित्र्याचें
होऊन मिटलेंय एकेक कमळ.
पाण्यावेगळें पाणी करून
ही शोधतेय कसलें गरळ?
मोकळ्या केसांनी झाकून
अर्ध्या चेहऱ्याने ही उभी,
बेपर्वाई बटा झटकून सांगते :
वाऱ्याची पकडतेंय पारंबी...

सर्सर सर्सर वाजे

सर्सर सर्सर वाजे . . .
पत्ताच पत्ताच नाही;
वाऱ्याशीं निरोप आला :
आत्ताच आत्ताच नाही.

टप्पोर टप्पोर कळ्या
विलग झाल्यात कांही;
नुस्ताच हलून वारा
सुगंध हलत नाही.

झंझन झंझन झालें,
पाखरूं उडत गेलें;
उलट उलट झाड
तळ्यांत बुडत गेलें.

झर्झर झर्झर गेली
घाईत घाईत कोण ?
गवतपातींत सर
उन्हांत पाडीत सोनं.

थर्थर थर्थर शुभ्र
झाडून उदास पंख,
तळ्याशीं अनाम पक्षी
झालेला निव्वळशंख.

ब्रह्मार्पण

क्षमस्व कोणी आणि कुणाला म्हणावयाचें?
जें घडलें तें होतें सगळें घडावयाचें.
कां नेत्रांच्या पात्यांवर ही अशी अशांती?
बघशि तयांतुन का दीपांच्या दुरस्थ पंक्ती?
अशी दचकशी पुनःपुन्हा कां दुभंगल्यासम?
समोरच्या त्या फांदीवरला फडफडतो खग.
समीपचा हा दीप सखी तूं मालवतांना
काय हरवले पाऱ्यासम ते 'स्व'गंधरंग?
क्षमस्व तुजला म्हणावयाचें असेल तर म्हण:
क्षण ते झाले तुझे नि माझे गे ब्रह्मार्पण

भूल

कुणाला सांगूं नये
याही ओंजळींत फुलें होतीं,
त्यांनाही भूल पडली होती कोमेजून जातां जातां.
त्या दिवसानंतर
नेहमीच ही ओंजळ माझी मलाच भूल देते;
पण पुन्हा कोमेजण्यासाठी सुद्धा
यांत फुलें नकोत?

श्रद्धांजली

या वर्षांतील ही प्रथमच कविता.
निःशब्द
प्रत्येक झाड, त्यावरील पक्षी,
लाल शेंदरी वळण,
पायठसे, पाचोळासुद्धा.
उभाच्या उभा माणूस या मातीचा
गमावल्यावर
माती निःशब्द.
गमावलाय माझाच एक माणूस:
गमावलेला तोही निःशब्द.
दिसतोय फक्त त्याच्या हरहुन्नरी ओठांवर
टपोर मोगऱ्यानंतरचा हास्यमंद्र.
या वर्षांतील ही एक प्रथम कविता,
जी तो वाचणारही नाही;
पण निःशब्द मध्यरात्रीला
टपोर हास्यमंद्र समेवर येताना
कदाचित् उघडेल आपोआप ही वही.

पुनश्च

थवाच्या थवा
भिरभिर आला अन् गेलाही,
इथलें फक्त नेत्रपातें हललें,
पुनश्च जिथल्या तिथें.
सबंध बाग
फुलून आली, मिटूनही गेली,
इथल्या एका पक्ष्याचें मानेवरचें पीस थोडें फुगीर झालें,
पुनश्च पक्षी जशाचा तसा.
धुक्याची लाटच्या लाट
पसरली, वितळूनही गेली,
इथल्या एका झाडाच्या पानांवरून चार दवबिंदू ठिबकले.
पुनश्च झाड कोरडेंच उभें.
पुनश्च पुनश्च
गच्च गच्च
करकचून
उभा
मी. झाडावर मिटलेला बसून थवाच्या थवा.
एक नवीन कळी कुठेतरी आंतून सलतेय
कारण एक नवीन कांटा एका फांदीवर उठतोय.

कुत्रा

कुत्रा भुंकतोय
एकटाच,
स्वतःवरच;
दगड भिरकावणारें पोर एकटेंच,
उलटतोय दगड त्याच्यावरच.
ऊर फुटतोय
आंतून,
सूर ठणकतोय
बाहेरून.
चौकटीवर येतोय भरून
धुक्याचा मेघ.
कुत्रा बसतोय
मान टाकून पुढच्या दोन तंगड्यांवर
आणि चिमणी शोधतेय
गॅलरीतला क्षणापूर्वीचा उन्हाचा चौकोन.
चौकटीवर येतोय
काळा ठिपका
आणि भिंतीवर उभीच्या उभी सरकतेय मुंग्यांची रांग.
कुत्रा कान फडफडावून
पुन्हा बसला तंगड्यांवर मान टाकून.

बभ्रा

चारचौघांत बभ्रा झालेला वारा वाहातोय
आणि पुनःपुन्हा त्याचा बभ्रा होतोय, हें चांगलं का?
आणि ज्याचं कधी नांवही उच्चारलं गेलं नाही
असा एक पक्षी नित्यनेमाने येतोय, हें पटेल का?
चारपांच मेघ दुपारच्या वेळीं आकारून गेले,
वाऱ्याच्या मनांतलं कांही किंचितसं सांगून गेले,
पण जें त्यांनी सांगितलं त्यामुळं पक्ष्याच्या मनांत
काय झालं? त्याच्या झाडाचं एक पान तेवढं हलून गेलं.

विरंगुळा

तूंहि हसतेस रस्ता चुकतो म्हणून?
हें तुझ्यामुळंच होतंय ठेव समजून.
आम्ही कसे आहोंत शोध घ्यायचाय?
कां? इतक्यांतच रस्त्यावर जीव द्यायचाय?
भुतासारखे उलटें उलटें चालावें लागतें
स्वतःचें फुटकें भिंग उघड्या डोळ्यांनी पाहून.
हसणारी जिवणी तुझी एक उदास कहाणी
मी नसेन तेव्हा सांगेल: तुला तेवढाच विरंगुळा.

कुणाच्या खांद्यावर

कुणाच्या खांद्यावर कुणाचें ओझें ?
कुठें उतरावें ? कशासाठी तंबू ठोकून ?
कोण मेलें कुणासाठी रक्त ओकून ?
या सगळ्याचा हिशेब ठेवायचा कुणीं ?
मनांतल्या मनांत कुजून जगतात कुणी
गुलाब राहतील तरीही ताजे.
कुणाच्या खांद्यावर कुणाचें ओझें ?

इथले सगळे दिवे विझून जातात,
अंधारांत वृक्ष गोठून झडत राहतात,
कुणी करतात प्रीत, कुणी करतात पूजा,
कुणी खोकत खो़कत जीवनाशीं पैजा
मारून म्हणतात : आम्ही राजे !
कुणाच्या खांद्यावर कुणाचें ओझें ?

अंत झाला अस्ताआधी, जन्म एक व्याधी,
वेदनांचीं गाणीं म्हणजे पोकळ समाधी.
कुणी देतो एक हळी, त्याचाच पडतो बळी,
हारासारखें हौतात्म्य त्याच्या येतें गळीं,
त्याचे त्याला माहीत पंजे.
कुणाच्या खांद्यावर कुणाचें ओझें ?

रावबाच्या लेकीवरील दोन कविता

.१.

रावबाजीची चुकली गाय
कातरवेळे रानच्या दरीं;
एकुलती लेक काकुळती
फिरे एकलीच भिरीभिरी.

आली पहाटच्या पाराला,
दाराला वाजला घुंगरू,
आली वासराची हंबर,
धार सुटली झुरूमुरू.

रावबाजीची आली गाय,
लेक कुठे वो गेली सांगा?
"घाल मांडव रावबाजी!"
चाफ्यावरून बोले कागा.

.२.

माय सांगते लेकीच्या कानीं:
पहिलटकरीण गो माय,
वाकल्यावाचून ठाय ठाय
स्तन पान्ह्यान् भरत नाय.

उन्हांत जशी श्रावणसर
संसारीं तशी साखर पेर,

घरादाराला शरण जा गो
मुंगीसारखी आयुष्यभर.

कणसं आलीं भराला आता,
बांधावर गो लेकाला ठेव,
सफळ वारा लागूं दे त्याला :
पचेल वज्रकाळाचा घाव.

राजाराणी

जीवन : श्वासनिःश्वास राजाराणीचे;
श्वासनिःश्वास : झोकेच झोपाळ्याचे.
श्वास एक राजाचा, एक राणीचा :
दोघांचे श्वास, एक निःश्वास दोघांचा.
आकाश भेटणें दोघांच्या डोळां : जीवन.
झोपलें शरीर त्यांना होतें पांघरूण.
मृत्यु : जीवन : जीवन प्रीत राणीची;
प्रीत : सकाळ बागबगीच्यावरची.
मृत्यु : राजाच्या राणीचा बागबगीचा.
चिता : वाऱ्याला फुटे दरवळ ज्वाळांचा.
जीवन : राजा : राजाही होतसे राणी.
ओहोटीभरतीसें वादीसंवादी पाणी.
शरीरें सर्वांचीं पकडून समेप्रमाणे
प्राणाचा एकांत राजाराणीचा होणें.

एकत्र गाठूं तळ

दे दे अशीच पूर्ण घटिका कालप्रवाहीं बुडूं,
धागा असाच जीर्ण लटका तोडून शून्यीं उडूं;
आलों कुठून पंथिं एकत्र दोघें अशीं,
झालों तुटून खोल पडल्या उल्काच बेवारशी.
राणी म्हणून हात दिधला: अश्रूच हातीं मिळे,
डोळे टिपून मंद हसतां झालों पुन्हा आंधळे.
जोडून पर्ण पर्ण पिकलें झाकूं रिते निर्झर,
येतो चुकून आर्त हृदयीं त्यांचाच दीर्घस्वर.
तेढी अनाम शीळ उठते काचेस जैसा तडा,
कोणी खुपसून चोच हृदयीं तोडीत बैसे तिढा.

तोलूं उचलून मंद्र जणु की एकांत हा निश्चल,
तूं मी वितळून त्याच विलयीं एकत्र गाठूं तळ.

कृष्ण

गवळणी येतांना होता कृष्ण,
आल्यावरसुद्धा होता कृष्ण,
तो, गेल्यावरही, होता कृष्ण:
पण हें ज्यांना माहीत नाही
असे चुकचुकतात: "कृष्ण. . . कृष्ण."

आजची तारीख

शवयात्रा निघालीय, थांब जरा;
नमस्कार! सुटला, मिटला बिचारा!
निःशब्द होतांना हसला असेल,
त्याचीही पुराणी प्रिया भेटली असेल
त्याला, भरल्या डोळ्यांनी गेली असेल
तुटलेल्या पतंगासारखी झळकून.

शवयात्रा निघालीय, थांब जरा;
घे जरा स्वतःला निमूट पारखून :
तो बघ तुझा चेहरा जसा एखादा
पानझडीतील अबोल पक्षी;
कां? त्याला काय हवंय? दुःखच?
त्यासाठी मीच मिळालों का साक्षी?

शवयात्रा निघालीय, थांब जरा;
दे एखादं फूल, एखादं मिनीट;
मिनिटावर 'त्या'ही असेल माझ्या
असंच एखादं फूल, विलग मूठ.
दुःखाचे डोंगर कुणीं रचले
दुरून साजरे तुझ्या स्वप्नांसारखे?
स्वप्नंसुद्धा पडतात अशीं की
फुटून त्यांचे खंडखंड तुझ्यासारखे.

शवयात्रा निघालीय, थांब जरा;
मलाहि जरा नम्रपणे घेऊं दे

उचलून माझें सगळें आयुष्यच
खांद्यावर – सवई मलाही होऊं दे!
शवयात्रा निघालीय, चल आता,
पाहूं आलीं तर आपलींही फुलं वाहतां.

थोडे चोर थोडे साव

उन्हें पिकणार आता, यायचींत पाखरं,
हुरहूर पाहूं लागलीं तुझ्या डोळ्यांचीं कोकरं.
वारा वाहतोय कसा धारोष्ण शीतळ,
उघडं पडून चकाकेल गवताचं पितळ.
पानन्पान कोमट झालंय, वाजतायत वेळू,
लागतीलसुद्धा श्वासोच्छ्वास आपसुकच बोलूं.
ही वेळ गाण्याची . . . दूर डोंगराची रेघ
खोलवर चकाकतेय, वर एक किरमिजी मेघ.
नव्हे नव्हे लकेर, पोरी, तुझाच हलला शेला;
सायंकळ्या नव्हेत, तुझ्या केसानांच गंध आला.
उन्हें पिकलींत आता, आलीं आहेत पाखरं,
उतारावर हुरहुर हुरहुर, भ्यालींत का कोकरं?
नव्हे नव्हे दिवेलागण, तुझ्याच डोळ्यांचे गाव
मंद नुक्ते उजळताहेत थोडे चोर थोडे साव . . .

ओंजळ

एकमेकांसमोर
बसून राहा वनांतील शांतपणे.
रानवारे
रानझरे
रानपक्षी
एक सगळीं मिळून वनभोर
संध्याकालीन चित्रमय लिपी.
आणि दूरच्या डोंगरावरील जाळ
एकमेकांसमोर उलगडेल आणि
दोघांच्याही ओंजळींतून
भळभळणारा काळोख
रानवाऱ्यांवर, रानझऱ्यांवर, रानपक्ष्यांवर.

भुतें

तें आणि हें
हें आणि तें
इथेतिथे चहुकडेच उभे नागवे कडे;
ते इथे हे तिथे
मध्ये भरपूर भुतें, त्यांचें कर्कश्श रडें.

दिवे

किती तऱ्हा प्रकाशाची :
दिवे :
किती ठिकाणीं पसरतोय
प्रकाश.
दिवे
किती वेगवेगळे पण
तेच दिवे.
स्वीच जरा वेगळे पण
प्रकाश क्षणाक्षणाला विलक्षण, मनस्वी.
दिवे लागतात पण
प्रकाशांतून जातांना मनाला अंधार चाचपतोय.

वळण

वळणावर रस्ता येतो,
रस्त्यापाशीं वळण येतें,
वळणावरून कोण येतें?
रस्त्यावर काळीशार
आडवी तिढी
सावली
येते. . .पसरते लांबच लांब.

सर्वत्र काय?

घड्याळाचा काटा मिनिटांवरून फिरत जाय.
सर्वत्र पाय
पोहोचत नाहीत याला तरी इलाज काय?
सर्वत्र साय
तापवून निवल्या दुधावर. . .उपयोग काय?
कुठे दुधाचा गुण, कुठे साईची सोय, कुठे आगीचा धर्म!
निर्गुण निराकार
इलाज नाइलाज
घड्याळाचा काटा वर्तुळांत फिरत जाय.

झाड

झाडाला आलें फूल,
झाडालाच पडली भूल,
फुलाला आले फळ,
फुलाला पडली भुरळ,
फळावर आले रंग,
ते त्यांच्यांतच दंग,
फळ पडलें तुटून
झाड गेलें वठून.

तूं

तूं तेव्हा अशी,
तूं तेव्हा तशी,
        तूं बहरांच्या बाहूंची.

तूं ऐल राधा,
तूं पैल संध्या,
        चांफेकळी प्रेमाची.

तूं कांही पानें,
तूं कांही दाणे,
        तूं अनोळखी फुलांची.

तूं नवीजुनी,
तूं कधी कुणी,
        खारीच्या ग डोळ्यांची.

तूं हिर्वीकच्ची,
तूं पोक्त सच्ची,
        खट्टीमिट्ठी ओठांची.

तूं कुणी पक्षी :
पिसांवर नक्षी
        कवितेच्या ईश्वराची.

नको

अशी पुन्हा येऊं नको
        कोवळ्या उन्हाची,
अशी पुन्हा येऊं नको
        कळ्यांच्या वासाची.
नाही नाही, यायचं नाही,
उलट उत्तर द्यायचं नाही.
तशी पुन्हा जाऊं नको
        कातरवेळेची,
तशी पुन्हां जाऊं नको
        हुरहुर श्वासांची.
नाही नाही बांधायचं
भलतं पाणी सांधायचं,
अशी तशी येत रहा,
        येतजात रहा :
रहा कसा म्हणूं? नको म्हणूं?
        वळून पहा!
नाही नाही वळायचं
त्यांतलं कांही कळायचं,
अशी पुन्हां होऊं नको
        तलम शेल्याची,
अशी पुन्हां होऊं नको झाल्यागेल्याची.
हलता झुला वाऱ्याचा
कसा कसा बांधायचा?

रत्न

एकदा कधीतरी मीही हा गुन्हा केला होता,
त्यानंतर पुन्हा विसरून जाण्याचा प्रयत्न.
पत्ताच नव्हता गाडीत कोण होतें समोर,
सहज पाहिलें त्या डोळ्यांत, दिसले मनमोर.
फिरत होती ती दृष्टी. . .ती यष्टी अंगचोर. . .
डोंगरांतून दऱ्यापहाड पाहत घनघोर.
याला कुठे पाहिलेंय मी, डोळे सांगत होते;
हिला कुठे पाहिलेंय मी, मन रांगत होतें.
गळ्याखाली घाम फुटला: छे छे, ती नव्हेच;
इतकी लहान झाली कधी? तोही मी नव्हेच.

बोला हो तुम्हि बोला नाऽऽ – तीच लकब लाडिकपणा –
पाणी द्या नऽऽ पाणीऽऽ फार तिखट हे वडे,
बघा ना हो जीभ कशी फुटून झाली लालीलाल. . .
तोच सगळा हैदोस. . .पडणार पुन्हा तेच तडे!

आता पुन्हा कसलें मरण तेंच पुन्हा मरायचें!
तरीसुद्धा अस्सल वीष रत्न म्हणून जपायचें.
येतां येतां हरवते अन् जातां जातां मिरवते;
बघूं नवा कसला बेत गुन्ह्यासाठी ठरवते.

लवलव करी पातं

लवलव करी पातं :
डोळं नाही थाऱ्याला;
एकटक पाहूं कसं
लुकलुक ताऱ्याला ?

चव चव गेली सारी,
जोर नाही वाऱ्याला;
सुटं सुटं झालं मन :
धरूं कसं पाऱ्याला ?

कुणी कुणी नाही आलं,
फडफड राव्याची;
रुणझुण हवा का ही ?
गाय उठे दाव्याची.

तटतट करी चोळी,
तूट तूट गाठीची;
उंबऱ्याशी जागी आहे
पारूबाई साठीची.

उठे उठे चित्त उठे :
मधमाशी पोळ्याची;
कायावाचामन सारं
बागशाही माळ्याची.

सरभैर येडंपिसं
लवलव छातीचं,
आल्या आल्या कसं सोडूं
पारवळ हातीचं.

कुठल्या कवितेसाठी

कुठल्या कवितेसाठी न कळे
कुंठित झाले शब्द पुराणे,
किरण लांबतां लांबच गेले
डाळिंबांतच पडून दाणे.

पडून दिनमणि रंगीं, व्यंगीं
काय वेचितां येइल हाती?
दरींत घंटेचा ध्वनि भरतो,
थरकापत पण दिव्यांत ज्योती.

विचित्र आकारांच्या आडुन
कोण हलवतो छातीवरचा
दगड नि झाडुन मोहर सारा
वेध घेतसे त्या कवितेचा?

तिसराच कुणी

देणारा कुणी तिसराच :
आपणच फक्त दार लावायचें;
घेणाराही कुणी तिसराच :
आपण फक्त दार उघडायचें.
तहान लागली तर पाणी,
भुकेसाठी अन्न, झोपेला शय्या
हें सगळें सज्ज असतें,
पण हादरेल केव्हाहि घराचा पाया.
वासरूं कसें हंबरतें आणि
गाय कशी लगबगीने घरा येते,
पक्षीसुद्धा असेच पाघळतात,
पण तिसऱ्याला मात्र सगळें कळतें.
मी हा असा आज आहें,
उद्या असेन. . .परवाचें काय सांगूं?
म्हणून काय झालें – कशाला
उगाचच मी परवासाठी दुभंगूं?
देणारा कुणी तिसराच
दारावर, दारांत, घरांतही येईल,
कदाचित् तोहि म्हणेलसुद्धा
''रंग करा'' आणि निघूनसुद्धा जाईल.

दुःख ना आनंदही

दुःख ना आनंदही अन् अंत ना आरंभही,
नाव आहे चाललेली कालही अन् आजही.
मी तसा प्रत्यक्ष नाही, ना विदेशी मी जसा,
मी नव्हें की बिंब माझें, मी न माझा आरसा.
एकला मी नाहि जैसा, नाहि नाहि मी दुणा,
मी नव्हें स्वामीहि माझा, मी न माझा पाहुणा.
प्रश्न की उद्‌गार नाही, अधिक नाही वा उणा,
जीवनाला ऐल नाही, पैल, तैसा मध्य ना.
याद नाही, साद नाही, ना सखी वा सोबती,
नाद आहे या घड्याला अन् घड्याच्या भोवती.
सांध्यछाया आणि काया जोडुनी यांचा दुवा
नाव आहे चाललेली, दूरची हाले हवा.
दुःख ना आनंदही अन् अंत ना आरंभही,
नाव आहे चाललेली कालही अन् आजही.

पारवे

हालली का गर्द जाळी, मंद झाले का दिवे?
शीळ आली कापरी अन् गारवा हा जाणवे.
पायवाटेची अडाणी नागमोडी वक्रता
देतसे देहास वेढे, पाय खिळतो चालता.
कोण होतो तेंहि नक्की नाठवे माझें मला,
वादळापूर्वीच झालो मी निनावी एकला.
लोळ आला अन् विजेचा रान सारें पेटलें,
भूत जन्मापूर्विचें त्या येथ माझें भेटलें.
जन्म अन् मृत्यूमधे तें, तें घरी अन् अंतरीं,
कोण मी अन् कां इथे मी प्रश्नचिन्हांच्यापरी?
कां दुभंगूं कां नये हा क्षितिजपडदा एकदां?
फक्त कानीं येत दिडदा येत दिडदा सर्वदा.
हालली कां गर्द जाळी, कांपरे झाले दिवे?
गोठलेल्या अन् गळ्याचे स्तब्ध येथे पारवे.

सूर्यास्त

जाहला सूर्यास्त राणी, खोल पाणी जातसे,
दूरचा तो रानपक्षी ऐल आता येतसे.
मेघ रेंगाळून गेला क्षितिजरेघीं किरमिजी,
वाजती या मंद घंटा: कंप त्यांचे गोरजीं.
वेळुरंध्रीं कां परंतू जीवघेणी स्तब्धता?
कां समेच्या पूर्विची ही आर्त आहे शांतता?
काचसा काळोख भोती: त्यांतुनी गावांतल्या
थेंब जैशा दीपपंक्ती हालती काळ्यानिळ्या.
पारवा शेला तुझा हा: स्पंदनें का त्यावरी?
दूर दृष्टी लागली कां? कां तनू ही बावरी?
धून पर्णीं निर्झराची लागली आता भरूं,
नेत्र कां ओथंबले गऽ? हात हातीं ये धरूं.
जाहला सूर्यास्त राणी, खोल पाणी जातसे,
दूरचा तो रानपक्षी ऐल आता येतसे.

विष

कंचकाळे नेत्र त्यांची दाट पातीं हुन्नरी
स्तब्ध कां गे? खोल त्यांचे घाव घालीं अंतरीं.
थंड त्या झाल्या निराशा, थंड झालीं आर्जवें,
नाहि डोळां राहिलेलें शल्य अथवा आसवें.
बालबुद्धी ते मनोरे, ते किनारे तापले,
वाहुनी लाटांत गेले शुष्क झाले शिंपले.
तूं म्हणाली : रे, जळूं दे आपुलीं दोन्ही शवें
बांधलेलीं रे मिठीने आंधळ्या वन्हीसवें.
साज काळा सज्ज होता : कांठ त्याचे केशरी,
ती मुजोरी, हिक्मती त्या थंड झाली कस्तुरी.
चाललों गर्दीत दोघें हात हातीं गुंफिले,
हरवलों गर्दीत दोघें एकमेकां शोधिलें.
शोधितों मी आजही तीं नेत्रपातीं हुन्नरी,
घाव ते अन् वीष त्यांचें शोधितों या अंतरीं.

सांजतारा

मी म्हणावें, सांजतारा तूं नि मी तो पाहुं ये,
तूं म्हणावें, रानवारा दे ठरूं ना वस्त्र हें.
मी म्हणावें, बागबगिचा येत बहरूं हा जुना,
तूं म्हणावें, तूं दिलेला गुच्छ पहिला शोध ना!
मी म्हणावें, तो घडूं दे एकदाचा तो गुन्हा,
तूं म्हणावें, शीळ आली रानपक्ष्याची पुन्हा.
मी म्हणावें, किर्‌मिजी तो मेघही गेला विरूं,
तूं म्हणावें, तो पहा ना दीपही लागे भरूं.
मी म्हणावें, बांधुं डोळे एकमेकांचे इथे,
तूं म्हणावें, सांडलेले रानकांटे या इथे.
तूं म्हणावीं गीतगाणीं, मी म्हणावें, थांब ना,
मूक डोळां प्रश्नचिन्हें कां उभी हीं सांग ना?
मी म्हणावें, सांजतारा तूं नि मी तो पाहुं ये,
तूं म्हणावें, रानवारा दे ठरूं ना वस्त्र हें.

दाद द्या

ही निकामी आढ्यता कां? दाद द्या अन् शुद्ध व्हा!
सूर आम्ही चोरितों कां? चोरितों कां वाहवा?
मैफलीची साथ आम्हां दैवयोगें लाभली:
न्या तुम्ही गाणें घराला, फूल किंवा पाकळी.
दाद देणें हेंहि गाण्याहून आहे दुर्घट:
गुंफणें गजरे दवाचे आणि वायूचे घट.
नम्र व्हा अन् सूर जाणा — जीवघेणा रंग हा:
साजरा उधळून आयू हो करावा संग हा.
चांदणें पाण्यांतलें की वेचितां येईलही
आणि काळोखांत पारा ये धरूं चिमटींतही.
ना परंतू सूर कोणा लावितां ये दीपसा:
सूर नोहे — तीर कंठीं लागलेला शापसा.
तीर तो उतरो उराशीं — दर्द हो गाण्यांतला:
पूर्ण जरिही लाभला ना, लाभुं दे अर्धी कला.

अंतरिक्षाचा इषारा

कोण होता तो प्रवासी, कोठुनी आला कसा ?
चालतांना कां मधे तो पेटुनी गेला असा ?
बैसला बागेंत, आले दूरचे रावे तिथे,
तो विचारी, "कां तुम्ही हो, धावतां जावें तिथे ?"
हासला अन् मोगऱ्याची वेल गेली सर्वदूर्
आणि गेला गंध जैसा सर्व त्याचा सर्व नूर्.
बंद ओठांनी निघाला पेटलेला एकला,
फाटलेल्या अंतरींचा सूर झाला मोकळा.
तो न गातो : ऐकतो तो सूर अपुला आंतला,
तो म्हणे, "जा जा तुम्ही हो, मी नव्हे हो त्यांतला."
शांत तो झालाच नाही अन् कधी होणेंहि ना,
जन्मला तो ही कृपा त्या मायबापांची म्हणा.
थांबवा हो येरझारे; कां झपूर्झा घालतां ?
अंतरिक्षाचा इषारा ये न त्याला जाणतां.

काय म्यां द्यावें

राहिलेलीं हीं फुलें घे; काय म्यां द्यावें दुजें?
जन्मजन्मीं मीं दिलेलें सर्व जें होतें तुझें.
ती गवाक्षांतील शिक्षा, त्या प्रतीक्षा आंधळ्या,
सांध्यछायांच्या किनारी, त्या लकेरी राहिल्या.
प्रीत केली, शुष्क झाली पाकळी अन् पाकळी,
व्यर्थ गेलें मी जळाची गुंफिण्या रे साखळी.
धूपदाणींतील झाला धूर आता कांपरा,
पानजाळीचा फुलेना शुद्ध आता मोगरा.
हे जुने पोशाख झाले, संपलेली ही तनू,
दागिने उतरूं निघाल्यें, काय मी माझें म्हणूं?
दीप जो तूं लाविलेला तोहि रे मंदावला,
या अखेरी येथ आला पूर – आता वाढला.
राहिलेलीं तीं फुलें ने. . .काय म्यां द्यावें दुजें?
त्या प्रवाहांतून गेलें सर्व रे माझें तुझें.

कां उदासी

कां उदासी कां तुला ही? भेटली तूं कां मला?
मोगरा होता निनांवी: हार तूं कां गुंफिला?
मी मजेने चाललेला मैफलीला एकला,
पाजळोनी पापणी तूं घाव तूं कां घातला?
घाव वर्मी घालसी अन् दुःख तें तूं भोगसी:
प्रीत केली पूर्वजन्मीं — पांग आता फेडशी.
हाक तूं देतांच येतों, मूक दोघें जागतों,
हात हातीं तूं दिलेला सर्व कांही जाणतो.
खोल काळोखांत व्हावी गुप्त जैसी चांदणी,
दूर व्हावी सज्ज राणी जी तुझ्या डोळ्यांतुनी.
सर्वसाक्षी हें जुनेंसें झाड आहे आणि मी,
नेत्र राणीचे कसेसे बांधिले तूं नेहमी.
कां उदासी कां तुला ही? भेटली तूं कां मला?
मोगरा होता फुलेला: हार कां तूं गुंफिला!

रंग

ठेव रे विश्वास थोडा, श्वास दे घेऊं मला,
तापलेली रे तनू ही : वस्त्र दे उतरूं मला.
पौर्णिमा उधळूं निघाल्यें – सर्व रे सोळा कळा;
मी न आतां राहिल्यें रे पूर्विची ती चंचळा
पोक्त मी झाल्यें अता रे डाव मांडूं वेगळा :
हार किंवा जीत होणें हें नको रे आजला.
संपणारा जो क्षणार्धीं राहणें अर्धाचि वा
खेळ ऐसा खूप झाला, रंगला अन् संपला.
एक ऐसा डाव मांडूं, रंग झेलूं आंतला,
पावसाळी रंग बोलूं : मोर जैसा रे निळा.
रंग जर का खेळतांना सर्वही आले सरूं,
सात रंगांतून उरल्या अंतरंगा ये धरूं.
ठेव रे विश्वास थोडा, श्वास दे घेऊं मला,
तापलेली रे तनू ही : वस्त्र दे उतरूं मला.

निष्प्रेम

आता नसून आहें, तेव्हा तुला नकोसे
शृंगारसाज झाले आताच कां हवेसे ?
तेव्हा असून बाग नव्हता फुलांस गंध,
हृदयास कां धरावे गजरे अताच बासे ?
तेव्हा असून आग तापूं दिली न तार,
आता जिवास मार देतेस कां मुकेसे ?
तेव्हा असून सज्ज खेळू दिले न रंग,
आता उदास होशी काळ्यानिळ्या प्रकाशें ?
पाऊस श्रावणाचा तेव्हा उन्हास येतां
गेलीस कोरडी कां होऊन कां कसेंसें ?
कंठांत चातकाची तेव्हा तहान होती,
डोळ्यांत मीठपाणी आता कशास ऐसें ?
आता नसून आहें, तेव्हा असून नव्हतों,
सलगी कशास आता ? निष्प्रेम हे उसासे !

कां असे येतां

कां असे येतां नि जातां, ये न कांही सांगतां,
मी असावें आरशाशीं, दारिं कां घोटाळतां?
हा उदी पोशाख माझा : ही पसंती आपली,
कां मला देऊन जातां छंद हे ना मागतां?
धूपदाणीतील घेत्यें धूर मी कचपाशिं या,
आवडीचा गंध तोही कां तुम्ही हो टाळतां?
नांव तुमचें घेत रावा, लगबगी मी येतसें,
येथ झोपाळाच नुस्ता मंद राही हालता.
देतसां हुलकावण्या कां? त्याहुनी द्या शाप की!
धाप हृदया लागलेली. . . कां परीक्षा पाहतां?
वाहत्या पाण्यावरी मी ही तनू की ठेवितें,
पाहतें मी येतसे का पैलकांठीं पोचतां.
कां असे येतां नि जातां, ये न कांही बोलतां,
चित्रही रेखूं नये मी, रंगही ना खेळतां?

सूचना

या टपोऱ्या अक्षरांच्या पोर तूं पत्रांतली,
नागमोडी वक्र भाषा ही नव्हे सत्रांतली.
खोडिलेले शब्द कांही अर्थवाही चित्रसे
बांधिले पक्षीच जैसे. . .ही लबाडी आगळी.
हातचे राखून कांही खास फासे फेकिले:
हीं तुझीं उद्गारचिन्हें पाठशिवणी खेळलीं
डौल वळणें अक्षरांची पोक्त जैसी आढ्यता,
राहिलीं नामानिराळीं प्रश्नचिन्हें टाकिलीं.
अक्षरांची घेत जाळी आडुनी तूं त्या अशी
उष्ण श्वासांची नव्हाळी कां तुझी तूं चोरिली?
चोरितां ती येत नाही. तूं लिहीलें: रात्र ही
पाडिते टोले असे की लेखणी ही थांबली.
या टपोऱ्या अक्षरांच्या पाकळी पत्रांतली:
फूल आहे द्यावयाचें सूचना ही पोचली.

मृत्यूंत कोणि हासे

मृत्यूंत कोणि हासे, मृत्यूस कोणि हसतो,
कोणी हसून मरतो, मरत्यास कोणि हसतो.
अश्रूंत कोणि बुडतो, लपवीत कोणि अश्रू,
सोईनुसार अपुल्या कोणी सुरांत रडतो.
जनता धरी न पोटी साक्षात् जनार्दनाला,
जनतेस कोणि पोटीं पचवून हार घेतो.
विजनीं कुणी सुखी अन् भरल्या घरांत कोणी
वनवास भोगणारा दुःखांत शांत गातो.
कोणी जुनेपुराणे विसरे न पीळ-धागे,
कोणी तुटून पडला सगळ्याच पार जातो.
कोणास मेघपंक्ती दाटून गच्च येतां
लागे तहान, कोणी नाचून तृप्त होतो.
कोणी दिव्याशिवाय होतो स्वतःच दीप
कोणी दिव्यावरी अन् टाकून झेप देतो.

ऊनओल्या

ऊनओल्या गूजगप्पा, ऊनओला अन् अबोला,
ऊनओलीं तीं उन्हें अन् ऊनओला पावसाळा.
मंद झोपाळे हलावे, ऊन पायीं चिकणमाती,
उंचसे झोके चढावे, किरण गावे हातिं ओला.
सर्व देते. . . आणि येतें श्रांत डोळां मीठपाणी,
सर्व घेतों म्हणत 'राणी' : पेट घे कापूर ओला.
सर्व देतां येत होतें आणि देतां येत नव्हतें,
ती असोशी दाट ओली, पावसाळी तो उन्हाळा.
स्पर्श काळोखास करणें जीवघेणें वाटलेलें,
एक ओलासा उसासा तापल्या कानांत आला.
दिवस आले, दिवस गेले, संपले कांही ऋतू अन्
संपला काळोख नाही ऊनओला जांभळा.
श्रावणाच्या अन् उन्हाचीं झुंबरें मीं लावलेलीं
आणि आषाढी सरींचीं तोरणें माझ्या घराला.

तूं कुणाला मी म्हणूं

दोन हे आहेत पेले आपले नाही जणूं :
कोणता आहे तुझा अन् कोणता माझा म्हणूं ?
दोनही झालेत उष्टे : गरळ कंठीं दे जळूं,
दोनही तारांतुनी गऽ वीज लागो झणूझणूं.
दोन हे आहेत पेले : एक माझा संपला,
झाकुनी अर्धाच पेला टेकिली कां वर हनू ?
दे तुझा : झोकून घेतों, आणि माझा घे तुला,
होत जागीं रानगीतें : हृदय लागे गुणगुणूं.
तोहि केला तूं रिकामा : तोल जातो कां ढळूं ?
नेत्र हे रेंगाळती का सज्ज करिसी की धनू ?
दोन धारा एक झाल्या या प्रवाहीं : तूं नि मी,
पूर येतो वाढणारा, आपली नाही तनू.
दोन कोठे ? एक झालों – शून्य झालों की अशी :
तूं कुठे अन् मी कुठे अन् तूं कुणाला मी म्हणूं ?

प्रीत फिरुनी मागते

हारजीतींच्या दुव्यांचीं मी फुलें रे वेचितें,
हारजीतींच्या दुव्यांचे हार मी रे गुंफितें.
ऊन अन् पाऊस यांचे कांठ पदरा जोडुनी
वादिसंवादी सुरांच्या मी किनारीं धावतें.
मी अबोले गुच्छ केले रंग यांचे बोलके
आणि गजरे हुरहुरींचे मनगटीं मी घालितें.
आणि ताटातूट ऐसी मज परांची शेज रे
संपल्या साऱ्या प्रतीक्षा : दीप त्यांचा लावितें.
श्वास अन् निःश्वास माझे ऊनओले विणुन रे
थेट वाळ्याचाच पंखा हा तुझ्यास्तव बनवितें.
घे न घे रे, ये न जा रे, मीहि माझ्या सर्व रे
येरझाऱ्यांची कटीला मेखला मी बांधतें.
हारजीतींच्या दुव्यांचे हार माझे सज्ज रे
वाहुनी माझ्या चितेला प्रीत फिरुनी मागतें.

नवी . . . जुनी

एक आहे ही नवी अन् एक आहे ही जुनी :
एकमेकांचें कळेना काय नातें जीवनीं.
ही नवी घरदार मोडी की नव्या साडीपरी,
ही जुनी तें सर्व जोडी मंद गालीं हासुनी.
ही नवी शेजेवरी की आग जैशी लोळते,
ही जुनी अन् वावरे की दुरुन आली पाहुणी.
ही जुनी दारांतली अन् ही नवी दूरांतली :
एक लाजे ओढणी घे, एक उघडी चांदणी.
श्रांत झाल्या मस्तकाला देत मांडी ही जुनी,
ही नवी अन् देह सारा जातसे की जाळुनी.
पोक्त की सोळा कळांनी ही जुनी बहरास ये,
ही नवी जहरास येते गात्रगात्रीं हिरकणी.
ही जुनी हळुवार घेते हात हातीं, बोलते :
कां उदासी ? ही नवी अन् चूर होते लाजुनी.

लकेरताना

मौनांत पाखरांचे वनगीत शोधतांना
विजनांत सर्वदूर आलों कसा कळेना.
पाण्यावरील पान वाहून दूर जातें
पाण्यास कां मुळी तें शोधून सापडेना?
टाकूनही उसासे, ढाळून उष्ण अश्रू
जागे न गीत, जाग लागे न जागतांना.
एकांत निर्झराचा धरतो हळूच ठेका
अळुमाळ गीत तैसें सहजींच कां जुळेना?
निद्रिस्त वळूचणीला असतो बसून पक्षी:
चाहूल पदरवांची मिळतांच हातिं ये ना.
कांही नकोच होतें, गाणें नको न होतें:
मिळते न मागतांही, मागूनही मिळेना.
मुखरीत मौन गेलों वनगीत गात गात:
विजनांत सर्वदूर त्याच्या लकेरताना.

दोन मी

तो कुणी माझ्यांतला तो घनतमीं ठेचाळतो
तरिही मी कां चालतों? तो बोलतो ना थांबतो.
वाकणाऱ्या अन् मला तो पाहुनीयां मोडतो,
झाकितो तो गच्च डोळे, श्वास वक्षीं रोखितो.
अग्निज्वाळेच्यापरी तो नग्न आहे केशरी
कल्पना होती अशी अन् अजुन आहे ती खरी.
कोणते पोशाख त्याचे चोरिले मीं भर्जरी:
विकित बसलों येथ हाटीं, आणि खातों भाकरी.
तो उपाशी तरिहि पोटीं लाज माझी राखतो,
राख होतांनाहि ओठीं गीतगाणीं ठेवितो.
मैफलीला तो नि मी दोघेही जातो धावुनी:
ऐकतों मी सूर, तो अन् दूरचे घंटाध्वनी.
तो कुणी माझ्यांतला तो घनतमीं तेजाळतो
दीन मी बांधून डोळे एकटा अन् चालतों.

जाईन दूर गावा

तेव्हा मलाच माझा वाटेल फक्त हेवा,
घरदार टाकुनी मी जाईन दूर गावा.
पाण्यांत ओंजळीच्या आला चुकून मीन
चमकून हो तसाच गाण्यांत अर्थ जावा.
शिंपीत पावसाळी सर्वत्र या लकेरी
यावा अनाम पक्षी, स्पर्शू मलाच यावा.
देतां कुणी दुरून नक्षत्रसे इशारे
साराच आसमंत घननीळ होत जावा.
पेरून जात वाळा अंगावरी कुणी जो,
शेल्यापरी कुसुंबी वाऱ्यावरी वहावा.
तारांवरी पडावा केव्हा चुकून हात:
विस्तीर्ण पोकळीचा गंधार सापडावा.
तेव्हा मलाच माझा वाटेल फक्त हेवा,
घरदार टाकुनी मी जाईन दूर गावा.

कल्लोळ अन् भ्रमंती

कल्लोळ दो जिवांचा, दाही दिशा भ्रमंती,
शून्यांतुनी भराला एकान्तप्रांत येती.
दोघे मिळून झोके घेतात उंच उंच :
एकान्त हो जणू की दोलाच दोन हातीं.
पेरीत बीबियाणीं दोघे मिळून रानीं,
एकान्त ये भरूनी घनश्यामसा दिनांती.
दोघे मिळून रंग चौफेर फेकितात,
एकान्त इंद्रगोफ होतो कधी दिनांतीं.
दोघे मिळून घेती विश्राम विजनकुंजीं,
एकान्त हो जणू की कुजबूज उष्ण ओठीं.
दोन्ही मिळून वन्ही होऊन एक होती,
एकान्त आरपार अंधार आदि अंतीं.
एकान्त संभवेना कधिही न एकल्याचा,
एकान्त बागबगिचा, कल्लोळ अन् भ्रमंती.

पावरी

वाजेल पावरी का पुन्हा तशी फिरून?
येईल बावरी का पुन्हा तशी दुरून?
एकेक नूर होता फसवा तरीहि पोक्त,
मनसोक्त खार फिरली पिकल्या फळांवरून.
डोळे पुन्हा तसे ते मिटले न भेटले अन्
पदरास नाहि आलीं उन्हें तशी फिरून.
रेषा न नागमोडी पुन्हा न निर्झरीची,
चमकून वाजली ना रुणझूण बावरून.
तसला न गारवा तो पडला न आसमंतीं,
घडला नवा न गुन्हा उल्काच की तुटून.
नव्हतेच रागलोभ, होती तिची धिटाई,
प्रेमांतली मिठाई: झाले विषाक्त प्राण.
''मिळतां नये'' म्हणाली, ''कवितेस अन् विराम'',
टाकून गोफ अर्धा गेली दिठी भरून.

टाहो

कोणीच येइना कां? कोणी असेल का हो?
असल्यास मैफलीला या हो, खरेंच या हो,
सारेच आजकाल झालेत पाठमोरे:
जखमेंत मीठपाणी चोळूं तरी वळा हो.
माझ्या पराभवाची आताच कां टवाळी?
मागून गा कवाली! आता समोर या हो.
पडलींत स्वप्नवत् हीं पात्रें इथे रिकामीं
भरतील तीं फळेंशीं: तुम्ही अहांत रावो.
पोलाद जाळणारी होती उरांत मस्ती,
आता उठून वस्ती आम्हीच फक्त आहों.
याहून काय आयू फेडील? बर्‌गडीचा
तो सूर हो घडीचा त्याचीच याद राहो.
आता अशा मला कां दिसतात फक्त भिंती?
सारे प्रतिध्वनी ते घुमटांत देत टाहो.

सांगेल राख माझी

संपूर्ण मी तरू की आहें नगण्य पर्ण
सांगेल राख माझी गेल्यावरी जळून.
खोटीं खरीं दुधाचीं होतीं कशीं बिजें तीं,
बरसून मेघ जातां येईल 'तें' रुजून.
रानीं कुठून आलों? गाऊन काय गेलों?
वेळूंत सांध्यवेळीं येईल तें कळून.
लागे मला कशाची केव्हा कशी तहान:
चर्चा कशास? नाव काठास की अजून.
कोणा फुलें दिलीं मीं, माळून कोण गेलें?
शेल्यावरी कुणाच्या असतील स्पर्श ऊन?
कां ते कशास सांगूं मांडून मी दुकान?
शब्दांस गंध सारे असतील की जडून.
काठास हा तरू अन् विस्तीर्ण दूर पात्र
केव्हातरी पिकून गळणें नगण्य पर्ण.

सप्रेम द्या निरोप

तो एक वृद्ध माळी गेला पिकून आहे,
निद्रिस्त शांतकाय आता पडून आहे.
गुंफून शेज त्याची हळुवार पाकळ्यांनी
हा वेल मोगऱ्याचा पानीं मिटून आहे.
अंगावरी कळ्यांची पसरून शाल गेला
सारा गुलाब: आता रोखून श्वास आहे.
जाईजुई बसून कोन्यांत दूर कोठे
अस्फूट गीत मंद हुरहूर बोलताहे.
वनवेळु वाजताहे एकांतकिर्र ऐसा
माळीच की अखेरी निःश्वास टाकताहे.
वाजून मेघ जातो घननीळसा विरून
सर्वत्र तो भरून गंभीर नाद आहे.
बोले अखेरचें तो: आलों इथे रिकामा,
सप्रेम द्या निरोप, बहरून जात आहें."